दीपक दारव्हेकर, वडाळा.

□ नूरजहाँला मल्लिका-ए-तरन्नूम व मधुबालाला इन्डियन व्हीनस का म्हटले जायचे?

— नूरजहाँ तिच्या काळातील सर्वाधिक लोकप्रिय गायिका-अभिनेत्री होती. तिची गीते ऐकून वेणी साप्ताहिकाच्या संपादकांनी बदरी काचवालांनी तिला 'मल्लिका-ए-तरन्नूम' बिरूद दिले. पुढे हेच बिरूद तिला लावले जाऊ लागले. मधुबालाला इंडियन व्हीनसची उपमा दिली ती फिल्म इंडिया नियतकालिकाच्या संपादकांनी.

सौ. सुधा कोर्टीकर, पंढरपूर.

□ *मदर इंडिया* या चित्रपटात छोट्या बिरजूची भूमिका करणारा बाल कलाकार कोण? त्याचे इतर चित्रपट कोणते?

— त्या बालकलाकाराचे नाव मा. साजिद. *मदर इंडिया*नंतर तो *सन ऑफ इंडिया* या चित्रपटात बालकलाकार होता. काही इंग्रजी चित्रपटात तो बालकलाकार म्हणून चमकला होता. *सवेरा*सारख्या एक दोन चित्रपटात तो नायकाच्या भूमिकेत चमकला. पण नायक म्हणून त्याला फारसे यश मिळाले नाही. नंतर तो पॉप गायक बनला होता.

कमलजीत जसवंतसिंग भाट, लालबाग

□ राज कपूर यांच्या परिवारातील कोणकोणत्या सदस्यांनी हिंदी चित्रपटात बालकलाकार म्हणून भूमिका केली? त्यांचा पहिला चित्रपट कोणता?

— राज कपूर (पहिला चित्रपट १९३५चा *इंकलाब*), शशी कपूर (पहिला चित्रपट १९४८चा *आग*), ऋषी कपूर (पहिला चित्रपट १९७०चा *मेरा नाम जोकर*), नीतू सिंह (पहिला चित्रपट १९६६चा *सूरज*) हे कपूर घराण्यातील कलाकार बालकलाकार होते. रणधीर कपूर १९५६च्या *श्री ४२०* या चित्रपटातील 'प्यार हुआ इकरार हुआ' या गाण्यातील एका दृश्यात ऋषी कपूरबरोबर काही क्षण बालकलाकार म्हणून पडद्यावर दिसला होता.

सरोज सुखटणकर, लालबाग.

□ उत्पल दत्त यांचा पहिला चित्रपट कोणता?

— *भुवनशोम.*

अनिकेत सावंत, अंधेरी.

□ किशोरकुमारला कोणकोणत्या चित्रपटात रफीने उसना आवाज दिला?

— *रागिणी*, *भागमभाग* व *शरारत* या चित्रपटात.

अशोक परशुराम परब, ठाणे.

□ बी. आर. इशारा यांनी दिग्दर्शित केलेला पहिला चित्रपट कोणता? त्यांच्या *मिलाप* या चित्रपटाचे संगीतकार कोण?

— इशारांचा पहिला चित्रपट *चेतना*. *मिलाप*चे संगीतकार ब्रिजभूषण.

लीना सुर्यकांत शेलार, विक्रोळी.

□ कै. गजानन शिर्के यांनी कोणकोणते चित्रपट निर्माण केले?

— *मोलकरीण*, *कधी करिशी लग्न माझे*, *माय माऊली.*

कल्पक मधुकर शिंदे, मुलुंड.

□ ओ. पी. नय्यर यांचा पहिला चित्रपट कोणता?

— १९५२चा *आसमान*. तत्पूर्वी १९४९ साली *कनीज* या चित्रपटाचे पार्श्वसंगीत नियोजन त्यांनी केले होते.

यश राजेंद्र बैकर, ठाकुर्ली.

□ रफीने सर्वाधिक गाणी कोणत्या संगीतकाराकडे गायली?

— लक्ष्मीकांत प्यारेलाल, एकूण गाणी ३६९.

संतोष चंद्रशेखर हालकुडे, कुर्डुवाडी.

□ अमिताभबरोबर कोणती अभिनेत्री सर्वात अधिक गाजली?



अनेक चित्रपटात अमिताभची नायिका झालेली राखी *शक्ती* चित्रपटात अमिताभच्या आईच्या भूमिकेत.

— जया भादुरी, रेखा व राखी या तीन अभिनेत्री अमिताभबरोबर सर्वात अधिक गाजल्या. राखीने तर अमिताभबरोबर नायिकेची भूमिका करीत असताना *शक्ती*त त्याच्या आईची भूमिकादेखील केली.

तेजस जाधव, राजापूर.

□ भारतीय चित्रपटातील गीतकार व संगीतकार अशी दुहेरी भूमिका बजावणारा पहिला कलाकार कोण?

— गोविंदराव टेंबे. *अयोध्येचा राजा* या पहिल्या मराठी चित्रपटाचे गीतकार व संगीतकार तेच होते.

संदीप खोपडे, पुणे.

□ मराठी चित्रपटात लेखक म्हणून वावरत असताना चित्रपटात भूमिका देखील करणारे कलाकार कोण?

— विष्णूपंत औंधकर, आचार्य अत्रे, ग. दि. माडगूळकर, शांताराम आठवले, पु. ल. देशपांडे, सतीश आवेकर, द. मा. मिरासदार, शंकर पाटील, व्यंकटेश माडगूळकर, व. पु. काळे, वसंत सबनीस.

जानू वरक, रत्नागिरी.

□ वन्स मोअरची दाद मिळवणारे हिंदी चित्रपटातील पहिले गाणे कोणते?

— १९४०च्या *बंधन* या चित्रपटातील चल चल रे नवजवान.

विजेता प्रश्न

प्रमोद मोरे, वरळी बी.डी.डी.चाळ नं. ४०, रूम नं. ४४, वरळी, मुंबई-४०००११.

□ सुलोचनाबाईंचा पहिला हिंदी चित्रपट कोणता?

— कोल्हापूरात असताना *महारथी कर्ण*, *वाल्मीकी* या चित्रपटात सुलोचनाबाईंनी लहान लहान भूमिका केल्या होत्या. मुंबईतला त्यांचा पहिला हिंदी चित्रपट *नंद किशोर*. त्यांनी नायिकेची भूमिका केलेला पहिला हिंदी चित्रपट *सजनी*.